माझा संघर्ष
माईन काम्फ
हिटलरच्या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद

अ‍ॅडॉल्फ हिटलर

अनुवाद

पुष्पा ठक्कर

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

माझा संघर्ष : ॲडॉल्फ हिटलर
अनुवाद : पुष्पा ठक्कर

© **सुरक्षित**

प्रकाशक
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

अनुवाद
पुष्पा ठक्कर
६६, महात्मा गांधी नगर, रेल्वे स्टेशन रोड,
फायर ब्रिजच्या मागे, औरंगाबाद.
फोन नं. ०२४०-२३४७५७६ / मो.नं. ९७६४२८०२१६

अक्षरजुळणी
अजब ग्राफिक्स

मुखपृष्ठ
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

मुद्रक
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

आवृत्ती
ऑगस्ट २०१६

किंमत
₹ ६५०/-

प्रस्तावना

त्या काळच्या म्युनिक जनता न्यायालयाने दिलेल्या निवाड्यानुसार मी एक एप्रिल १९२४ पासून लॅन्डस्‌बर्ग लेचच्या किल्ल्यात माझी कारावासाची शिक्षा भोगू लागलो.

अनेक वर्षे विनाअडथळा मेहनत केल्यानंतर आता पहिल्यांदा ते काम करणे शक्य होणार होते जे करायला मला अनेकांनी सांगितले होते. तसेच चळवळीच्या दृष्टीने ते उपयुक्त होईल असे मला स्वत:लाही वाटत होते. म्हणून मी ठरवले की केवळ आमच्या चळवळीच्या उद्दिष्टांचेच वर्णन करायचे नाही तर तिचा विकास कसा होत गेला हेही विशद करायचे आणि हा विस्तार दोन खंडांत करायचा. एखाद्या सिद्धांताच्या निव्वळ प्रबंधापेक्षा यात शिकण्यासारखे फार काही आहे.

तसेच असे करून, पहिला तसेच दुसरा खंड समजून घेण्याच्या दृष्टीने माझा विकास कसा होत गेला, मी कसा वाढत गेलो याचे आवश्यक तेवढे वर्णन करण्याची आणि ज्यू वर्तमानपत्रांनी माझ्या जीवनाभोवती विणलेले कपोलकल्पित दंतकथात्मक माहितीचे जाळे तोडून टाकण्याचीही संधी मला मिळाली.

माझ्या या लिखाण-कार्यात मी अनोळखी लोकांचा विचार करणार नाही तर चळवळीच्या ज्या अनुयायांनी या चळवळीला आपले हृदय समर्पण केले आहे आणि ज्यांना या चळवळीचा अधिक सखोल अभ्यास करण्याची इच्छा आहे त्यांचा विचार करणारे आहे. मला माहीत आहे की फार थोड्या लोकांना बोललेल्या बोलांपेक्षा लेखी शब्दांनी जिंकता येते आणि या जगातील प्रत्येक चळवळीच्या विकासाचे आणि यशाचे श्रेय महान लेखकांकडे नव्हे तर महान वाक्यांकडे जाते.

असे असले तरी माझ्या सिद्धांतांना अधिक सारखेपणा आणि एकसंधपणा यावा यास्तव त्याची मूलभूत तत्त्वे लिहून काढायलाच हवीत. म्हणून मी करीत असलेल्या या एकत्रित कामाला या दोन खंडांनी पाया पुरवावा ही अपेक्षा.



– ॲडॉल्फ हिटलर
लॅन्डबर्ग ॲम लेचचा किल्ला

अनुक्रमणिका

खंड – १

सिंहावलोकन – मागे वळून पाहताना

१. माझ्या पालकांच्या घरी ७
२. व्हिएन्नातील अध्ययन आणि कष्टाची वर्षे २२
३. व्हिएन्नातील माझ्या वास्तव्यादरम्यान माझ्या मनात उगम पावलेली राजकीय विचारधारा ५९
४. म्युनिक १०३
५. विश्वयुद्ध १२७
६. युद्ध प्रचार १४०
७. क्रांती १४९
८. माझ्या राजकीय कार्याचा प्रारंभ १६५
९. जर्मन मजूर पक्ष १७३
१०. दुसरे संपूर्ण जर्मन राष्ट्र का कोसळले? १८०
११. वंश आणि लोक २२४
१२. जर्मन राष्ट्रीय समाजवादी मजूर पक्षाच्या विकासाचा पहिला टप्पा २६२

खंड - २

राष्ट्रीय सामाजिक चळवळ

१. वैश्विक दृष्टिकोन आणि पक्ष	....	२९३
२. राज्य	....	३०४
३. राज्याची प्रजा आणि नागरिक	....	३४२
४. व्यक्तिमत्त्व आणि लोकराज्याचे आदर्श	....	३४५
५. वैश्विक दृष्टिकोन आणि संघटना	....	३५२
६. आमच्या संघर्षाचा आरंभिक काळ	....	३६०
७. लाल सेनेशी संघर्ष	....	३७१
८. बलवान एकटा असतो तेव्हाच सर्वाधिक सामर्थ्यशाली असतो	....	३९०
९. वादळी तुकडी - स्वरूप आणि संघटन	....	३९७
१०. संघवादाचा मुखवटा	....	४२५
११. प्रचार आणि संघटना	....	४४५
१२. कामगार संघटनांची समस्या	....	४६१
१३. जर्मनीची युद्धोपरांत संधी-नीती	....	४७२
१४. पूर्व युरोपात जर्मनीचे धोरण	....	५०२
१५. स्वसंरक्षणाचा अधिकार	....	५२५
१६. समारोप	....	५४४

+++

खंड – १

सिंहावलोकन – मागे वळून पाहताना

माझ्या पालकांच्या घरी

दोन राज्यांच्या सीमेवर वसलेले ब्राऊनाऊ-ऑन-द-ईन हे गाव नियतीने माझे जन्मस्थळ म्हणून निवडले हे आज माझे सुदैव ठरले. कारण या दोन राज्यांना पुन्हा एकत्र करण्यासाठी आपले सगळे आयुष्य समर्पित करावे आणि त्यासाठी शक्य असेल त्या प्रत्येक साधनाचा वापर करावा हे कमीत कमी आमच्या युवा पिढीचे जीवितकार्य बनून गेले. आमच्या महान जर्मन मातृभूमीत जर्मन-ऑस्ट्रियाचा समावेश व्हायलाच हवा, या विचारामागे कोणतेही आर्थिक गणित नव्हते. मुळीच नाही, जरी हा मुद्दा आर्थिक कारणावर आधारित नव्हता, इतकेच काय हे पुनर्गठन आर्थिकदृष्ट्या गैरसोईचे ठरणार असले तरी तसे व्हायलाच हवे. एकाच रक्ताच्या लोकांनी एकाच जर्मन राष्ट्रात राहायला हवे. जर्मन लोक जोपर्यंत आपल्या सगळ्या बालकांना एका राज्यात एकत्रित करीत नाहीत तोपर्यंत त्यांना वसाहतवादी धोरण अमलात आणण्याचा काहीच अधिकार नव्हता. महान जर्मन राष्ट्राने सगळ्या जर्मन बांधवांना आपल्या कवेत घेतल्यावर असे आढळून आले की हा प्रांत सगळ्यांचे पोट भरण्यास असमर्थ आहे, तेव्हा आणि केवळ तेव्हाच, जनतेच्या गरजा भागवण्यासाठी परकीय प्रांत ताब्यात घेण्याचा नैतिक अधिकार त्यांना मिळणार होता. मग प्रत्येक नांगर तलवार बनून जाईल आणि युद्धादरम्यान गळणाऱ्या आसवांचे सिंचन लाभलेली भूमी येणाऱ्या कित्येक पिढ्यांसाठी अन्न देऊ शकेल.

आणि म्हणून हे छोटे नगर माझ्यासाठी महान कामाचे प्रेरणास्थान तर बनलेच, शिवाय ते असा धडा शिकवत होते, जो आमच्या त्या काळाला लागू पडत होता. परकीयांकडे गहाण पडलेल्या या स्थळी, शंभर वर्षांपूर्वी घडलेल्या एका दुर्दैवी आणि करुण घटनेचा परिणाम संपूर्ण जर्मनीवर झाला होता. जर्मनीच्या इतिहासाला ही घटना कायमची स्मरणात राहील. फ्रेंच सरकारचा शत्रू आणि राष्ट्राबद्दल तीव्र कळकळ असलेला एक पुस्तक-विक्रेता जोहानेस पाम याला जर्मनीवरील त्याच्या अपार प्रेमाला अपराध ठरवून देहदंड देऊन आमच्या पितृभूमीचा घोर अपमान केला गेला होता. त्याचे साथीदार किंवा खरे तर या कटासाठी मुख्यत: जबाबदार असलेल्यांची नावे सांगण्यास त्याने ठामपणे नकार दिला होता. लिओ श्लागेटरच्या बाबतीतही

अगदी तसेच घडले होते. दोघांनाही सरकारी एजंटाने फ्रेंच सरकारच्या हवाली केले होते. तो ऑसबर्न पोलिसांचा निर्देशक होता, ज्याने या घटनेबद्दल लाजिरवाणी ख्याती मिळवली. नंतरच्या काळात हे सिव्हरींग[१] सरकारच्या नव-जर्मन अधिकाऱ्यांनी देखील त्याचाच कित्ता गिरवला.

जर्मन हुतात्म्याच्या स्मृतीचे तेजोवलय लाभलेल्या छोट्या नगरात बावेरियन वंशाचे रहिवासी होते मात्र त्यांच्यावर शासन ऑस्ट्रिअन राज्याचे होते. गेल्या शतकाच्या अंतापासून माझे पालक इथे कायमच्या वास्तव्याला होते. आपले काम सदसद्विवेकबुद्धीने पार पाडणारे माझे वडील नागरी सेवेत कर्मचारी होते. माझी आई

१. हा आणि या पुस्तकात नंतर येणारा संदर्भ समजून घेण्यासाठी पुढील बाबी लक्षात ठेवायला हव्या.

१७९२ ते १८९४ पर्यंत जर्मनीवर फ्रेंच क्रांतिकारी सैन्याचा ताबा होता. १८०० मध्ये होहेनलिन्डनमध्ये झालेल्या ऑस्ट्रियाच्या पराभवात बावेरीआचाही हात होता. म्युनिक फ्रेंचांच्या ताब्यात आले. नेपोलीयनने केलेल्या प्रत्येक युद्धात आपल्या ३०,००० सैनिकांसह त्याला पाठिंबा देण्याच्या करारावर नेपोलियनने बावेरीअन इलेक्टॉरला बावेरीयाचा राजा केले. आता बावेरीआ पूर्णपणे फ्रेंचांच्या आधिपत्याखाली आला. हा तोच काळ होता ज्याच्या संदर्भात हिटलरने वारंवार 'जर्मनीच्या घोर अपमानाचा काळ' असे म्हटले आहे. दक्षिण जर्मनीत 'जर्मनीचा घोर अपमान' या शीर्षकाखाली एक पत्रक १८०६ मध्ये प्रकाशित केले गेले. पुस्तक विक्रेता जोहानिस फिलीप पाम हा या पत्रकाचा फैलाव करण्यात मदत करणाऱ्या अनेकांपैकी होता. एका बावेरीअन पोलीस एजंटाने त्याला फ्रेंचांच्या हवाली केले. त्याच्यावर खटला चालवला जात असताना त्याने त्या पत्रकाच्या लेखकाचे नाव उघड करण्यास नकार दिला. नेपोलियनच्या आदेशानुसार २६ ऑगस्ट १८०६ रोजी त्याच्यावर गोळ्या झाडून त्याला ठार केले गेले. त्या स्थळावर त्याच्या स्मृतीत उभारल्या गेलेल्या स्मारकाचा **बाल हिटलरच्या** मनावर ठसा उमटला.

लीओस्लागेटरचा किस्सा बऱ्याच बाबतीत अशाच प्रकारचा होता. लीओ तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी होता आणि तो १९१४ मध्ये स्वेच्छेने सैन्यात दाखल झाला. तोफखान्याचा अधिकारी बनून त्याने दोन्ही श्रेणीतील 'आयर्न क्रॉस' मिळवले. फ्रेंचांनी १९२३ मध्ये रुहर कब्ज्यात घेतल्यावर त्याने जर्मनीच्या वतीने विरोध नोंदवला. फ्रान्सला होणाऱ्या कोळशाच्या वाहतुकीत अडचण यावी म्हणून त्याने त्याच्या साथीदारांसह रेल्वेमार्ग उडवला. एका जर्मन खबऱ्याच्या मदतीने फ्रेंचांनी त्यांना पकडले. लीओने सगळी जबाबदारी एकट्याने स्वीकारली. त्याला देहदंडाची आणि त्याच्या साथीदारांना वेगवेगळ्या मुदतीसाठी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. रेल्वेमार्ग उडवण्याचा आदेश देणाऱ्यांची ओळख देण्यास लीओने नकार दिला. फ्रेंच सरकारसमोर दयेचा अर्जही केला नाही.

२६ मे १९२३ रोजी त्याच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या. त्यावेळी सिवरिंग हा जर्मनीत अंतर्गत बाबींचा मंत्री होता. असे म्हटले जाते की लीओच्या बचावासाठी त्याच्याकडे निवेदने केली गेली परंतु त्याने या प्रकरणात दखल देण्यास नकार दिला.

रुहरवर फ्रेंचांच्या आधिपत्याला विरोध करण्यात तो प्रमुख हुतात्मा ठरला तसेच राष्ट्रीय समाजवादी चळवळीचा महानायक बनला. फार अल्प वयात या चळवळीत सामील झालेल्या लीओचा सदस्य क्रमांक होता ६१.

गृहिणी होती. आपल्या मुलांची प्रेमळ देखभाल करण्यासाठी तिने आपले आयुष्य वाहिले. या काळापासून पुढचे फार काही मला आठवत नाही कारण मी अत्यंत प्रेम करीत असलेल्या या नगराला आम्हाला सोडावे लागले. काही वर्षांनंतर माझ्या वडिलांची बदली होऊन त्यांना प्रत्यक्ष जर्मनीतील पसाऊ शहरात नवीन पदभार स्वीकारावा लागला.

त्या काळी सरकारी कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात इकडून तिकडे बदली होणे हे स्वाभाविकच होते. पसाऊहून लवकरच त्यांची बदली लिन्झला झाली जिथे ते सेवानिवृत्त झाले; परंतु याचा अर्थ असा मुळीच नाही की त्यांनी आपल्या कष्टमय जीवनातून विश्रांती घेतली.

माझ्या वडिलांचे वडील अत्यंत गरीब, पण त्यांच्या चुळबुळ्या स्वभावाने त्यांना इतके बेचैन केले की त्यांनी लहानपणीच घर सोडले. मोजक्याच सामानाची पिशवी पाठीवर टाकून त्यांनी घर सोडले तेव्हा ते कसेबसे तेरा वर्षांचे होते. गावातल्या 'अनुभवी' गावकऱ्यांनी त्यांचे मन वळवण्याच्या प्रयत्नाला फोल ठरवत त्यांनी व्यवसाय-धंदा शिकायच्या हेतूने व्हिएन्नाची वाट धरली. ते मागच्या शतकातील पन्नासावे वर्ष होते. खिशात केवळ तीन 'गोल्डन' (तत्कालीन नाणे) असताना घर सोडून परक्या ठिकाणी जाण्याचा निर्णय घेणे हे एक अग्निदिव्यच होते; परंतु जेव्हा या तेरा वर्षांच्या मुलाने वयाच्या सतराव्या वर्षी कारागिरीच्या परीक्षेत यश मिळवले तेव्हाही तो समाधानी नव्हता. त्याने देश सोडला. त्या काळी दीर्घकाळापासून असलेली आर्थिक मंदी आणि सतत भेडसावणाऱ्या गरजा आणि दुःख यामुळे धंदा करण्याचा विचार सोडून 'काहीतरी उच्च' करण्याच्या त्याच्या निर्णयाला बळकटी मिळू लागली. लहानपणच्या अनुभवांवरून त्याला वाटायचे की चर्चचा प्रमुख पाद्री होणे म्हणजे यशाचे सर्वोच्च शिखर सर करणे. परंतु शहराच्या अनुभवांमुळे त्याच्या दृष्टिकोनाचे क्षितिज विस्तृत झाले होते आणि सरकारदफ्तरी चाकरी करणे हीच सर्वोच्च सिद्धी आहे असे त्याला वाटू लागले.

कठीण अडचणी आणि संकटांनी त्याला ऐन तारुण्याच्या भरातच राठ प्रौढपणा बहाल केला होता. सतरा वर्षाच्या या पोरसवदा तरुणाने सरकारी नोकर बनण्याचा दृढ संकल्प केला आणि तेविसाच्या वर्षी ते ध्येय साध्य करीपर्यंत चिकाटी सोडली नाही. एका गरीब मुलाने 'कोणीतरी खास' बनल्याशिवाय आपल्या मूळ गावी न परतण्याची भीष्मप्रतिज्ञा घेतली आणि ती खरी केली.

त्याचे इच्छित त्याला लाभले, परंतु त्याच्या गावी त्याला ओळखणारे कोणीच नव्हते आणि ते गावच त्याच्यासाठी परके बनून गेले.

आता वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी सेवानिवृत्त झाल्यावर एकही दिवस आळसात घालवण्याचा विचार त्याला सहन होत नव्हता. ऑस्ट्रियातील लाम बाक शहराच्या बाहेर त्याने एक शेत विकत घेतले आणि जातीने शेती करू लागला. अशा प्रकारे दीर्घकाळ कष्टाची कारकीर्द संपवून तो पुन्हा त्याच आयुष्याकडे परतला जे त्याचे वडील जगले होते.

हा तो काळ होता जेव्हा मला माझे स्वत:चे आदर्श पहिल्यांदा कळू लागले होते. शाळेच्या परतीच्या वाटेवर मी काही आडदांड मुलांसोबत हुंदडू लागलो ज्यामुळे माझ्या आईला काळजी वाटायची. या सगळ्यामुळे घरी बसून राहण्याऐवजी जीवनात गांभीर्याने कारकीर्दीची निवड करण्याविषयीचा माझा कल वाढू लागला.

एखादा व्यवसाय निवडण्याचा गंभीर विचार क्वचितच माझ्या मनाला शिवायचा. तरीही मला माझ्या वडिलांची कारकीर्द अजिबात नको होती. मला वाटते की आता माझ्यातील उपजत वक्तृत्वकला विकसित होऊ लागली होती आणि माझ्या सोबत्यांसोबत होणाऱ्या कमी-अधिक वाद-विवादादरम्यान ती आकाराला येऊ लागली. मी अशा तरुण टोळीचा म्होरक्या बनू लागलो जिला शाळेचा अभ्यास सहज आणि चांगल्या प्रकारे करता यायचा पण जिला वेसण घालणे कठीण होते. लाम बाकच्या चर्चमध्ये मी समूहगायनाचा सराव करीत असे त्यामुळे साहजिकच तिथे होणाऱ्या भव्य-दिव्य समारंभांचा माझ्यावर वारंवार भावनिक परिणाम होऊ लागला. ज्याप्रमाणे माझ्या वडिलांच्या लहानपणी त्यांना त्यांच्या खेड्यातील चर्चच्या पाद्र्याचे स्थान सर्वोच्च वाटायचे त्याचप्रमाणे आपण चर्चचा मुख्य पाद्री बनण्याचा आदर्श बाळगावा असे मलाही वाटू लागले, यात नवल कसले? कमीत कमी तात्पुरता तो आदर्श माझ्या डोळ्यांसमोर होता. परंतु माझ्या वडिलांशी होणाऱ्या माझ्या तारुण्यसुलभ वादाच्या परिणामी, आपल्या मुलातील वक्तृत्वाच्या देणगीचा उपयोग कारकीर्द बनवण्यासाठी होऊ शकतो असे माझे कौतुक त्यांना कधीच करता आले नाही. त्यामुळे साहजिकच माझ्या पोरकट कल्पना त्यांना कळायच्या नाहीत. माझ्या चारित्र्यातील परस्परविरोधी गुणांमुळे ते काळजीत पडायचे.

खरेतर अशा व्यवसायाबद्दलच्या तात्पुरत्या ओढीने माझ्या स्वभावाशी चपखलपणे जुळणाऱ्या आशांचा मार्ग मोकळा करून दिला. माझ्या वडिलांची पुस्तके चाळता-चाळता योगायोगाने माझ्या हाती सैन्यविषयक साहित्य लागले. यापैकी एक पुस्तक होते १९७०-७१ मधील फ्रॅन्को जर्मन युद्धाचा लोकप्रिय इतिहास. त्या वर्षादरम्यानच्या नियतकालिकांचा समावेश असलेले ते दोन ग्रंथ होते. मी अत्यंत आवडीने ते वाचू